# सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम
# जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी,बीड
# कंत्राटी पध्दतीने पदे भरणेबाबत जाहिरात

जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी, बीड मार्फत सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा पीपीएम समन्वयक व वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक (एसटीएस) हे कंत्राटी स्वरुपाचे पदे भरणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.खालील पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी पदा समोर दर्शविलेल्या ठिकाणी आपले अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दि. ०७/०९/२०१८ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन खाली नमुद केलेल्या नमुन्यामध्ये व्यक्तीशः सादर करावेत.

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | प्राधान्य | देय मानधन | अर्ज करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Dist PPM Cooridinator (जिल्हा पीपीएम समन्वयक) | ०१ | Post Graduate<br><br>2.one year experience of working in field of Communication / ACSM /Public Private partnership /health projects /programs<br><br>3.Permanent two wheeler driving license & should be able to Drive two wheeler | 1. Preference to those who have worked in RNTCP.<br><br>2.Certificate / Diploma / Degree /Masters holders in social science /mass Media communication /rural Development Advocacy / Partnerships / related field<br><br>3.Basic Knowledge of computers | Rs.19000/- PM | मा.सदस्य सचिव जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी , जिल्हा क्षयरोग केंद्र, सामान्य रुग्णालय परिसर , बार्शी रोड बीड ता.जि.बीड |
| २ | STS (Senior Treatment Supervisor) (वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक) | एकुण पदे ०२ (अ.जा.-१ अ.ज.-१) | 1.Bachelor's Degree or<br><br>Recognized in sanitary Inspector's Course.<br>2.Certificate course in Computer Opretion (Minimun 2 months)<br>3.Perment Two Wheeler Driving licence & should be able to drive Two Wheeler | 1.Tuberculosis health visitor's recognized course & two years of work experience in the related field<br>OR<br>2.Govt. recognized degree/ diploma in Social work or Medical Social work with two years experience in the related field.,<br>OR<br>3. Successful completion of basic training course (Govt. recognised) for Multi-purpose health workers or recognised sanitary inspector's course with two years of field experience in the related field.<br>AND<br>4. Good communication skills in local language & willing to travel. | Rs.15000/- PM | मा.सदस्य सचिव जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी , जिल्हा क्षयरोग केंद्र, सामान्य रुग्णालय परिसर , बार्शी रोड बीड ता.जि.बीड |

वरिल पदे हे निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे आहे.सदरच्या पदांवर कायमचा हक्क राहणार नाही.तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा सेवा संरक्षणा संबंधिचा दावा करण्याचे अधिकार राहणार नाही.

अटी व शर्तीः-

१. सदर नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असुन दि.०४ फेब्रुवारी २०१९ पर्यंतच नेमणुक देण्यात येईल.त्यानंतर राज्यस्तरावरुन प्राप्त होणाऱ्या सुचनेनुसार व सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम पुढे चालु राहील्यास पुर्नःनियुक्ती बाबत कार्यवाही केली जाईल.

२. पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४. जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागास्वर्गीय पदासाठी ४३ वर्ष तसेच शासन सेवेतुन सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी साठी वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.
५. उपरोक्त दोन्ही पदांसाठी प्राप्त अर्जाच्या संख्यानुसार एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन थेट मुलाखती घेण्यात येतील.वरिल पदासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार नियुक्त करण्यात आलेल्या निवड समिती मार्फत तोंडी मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.
६. शैक्षणिक अर्हता व आरोग्य विभागाशी संबंधित शासकीय संस्थामध्ये/स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कामाचा अनुभवाच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन अंतिम निवड करण्यात येईल.
७. वरिल पदाची निवड प्रक्रिया पुर्ण करुन प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व सदर यादी पुढील वर्षभरात जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी बीड येथे वेळोवेळी रिक्त होणाऱ्या वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक (एसटीएस) या पदांच्या भरती साठी वापरण्यात येईल.
८. सदर प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ,बीड यांनी राखुन ठेवले आहेत.
९. सदर रिक्त पदाच्या पदस्थापनेमध्ये बदल होवु शकतो.
१०.मुलाखतीसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अथवा कोणत्याही प्रकारचा भत्ता देय राहणार नाही.
११.सदर रिक्त पदासाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अनुभव व अर्हता ) आवश्यकते नुसार शिथिल करण्यात येईल. तसेच सदर रिक्त पदासाठी राखीव पदाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त पदाच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन खुल्या प्रवर्गातील उमेदवारास तात्पुरती नेमणुक देण्यात येईल.त्यामुळे खुल्या प्रवर्गातील उमेदवार राखीव प्रवर्गासाठी अर्ज करु शकतील.परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाल्यास खुल्या प्रवर्गाच्या अर्ज गृहीत धरले जाणार नाहीत.व अर्जाचे शुल्क परत दिले जाणार नाहीत.
१२.अर्जदाराल कंत्राटी कालावधीत त्यांच्या सोयीनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.
१३.अर्जदाराने अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.२००/- व मागासवर्गीयासाठी रु.१००/- चा District Integreted Health and Family Welfare Society Beed, RNTCP या नावे असलेला धनाकर्ष (डी.डी.)जोडावा.परंतु मागासवर्गीय उमेदवाराने खुल्या प्रवर्गातुन अर्ज केल्यास मागासवर्गीय उमेदवारास खुल्या प्रवर्गातील शुल्क रु.२००/-भरावे लागतील.
१४.अर्जदाराने अर्ज ए-४ आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात. अर्जदाराचे ठळक अक्षरात संपुर्ण नाव,अर्ज केलेल्या पदाचे नाव,पासपोर्ट साईज फोटो,जन्मतारीख,जातीचा प्रवर्ग,अर्जदाराचा संपुर्ण पत्ता (पीन कोडसह) व दुरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी,राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव व डी.डी क्रमांक, कामाचा अनुभव,काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी,पदाची जबाबदारी व वेतन, शैक्षणिक अर्हतेचा संपुर्ण तपशिल, अभ्यासक्रमाचे नाव,संस्था/विद्यापिठाचे नाव,उत्तीर्ण झाल्याचे वर्ष,गुणाची टक्केवारी. दुचाकी वाहन परवाना (जाहिरातीच्या तारखेपर्यंत वैध)इ.माहितीसह परिपुर्ण भरलेले अर्ज सादर करावेत.अपुर्ण अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.जाहिरातीसोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

आवश्यक कागदपत्रे:-

राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डी.डी.)खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु.२००/-व मागासवर्गीयासाठी रु.१००/- जन्मतारखेचा दाखला,शैक्षणिक अर्हतेसंबंधी आवश्यक कागदपत्रे,जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र (आरोग्य विभागाशी संबंधित शासकीय संस्थामध्ये/स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कामाचा अनुभव ), पासपोर्ट आकाराचे दोन फोटो,दुचाकी वाहन परवाना(जाहिरातीच्या तारखेपर्यंत वैध)इ.झेरॉक्स प्रति साक्षंकीत करुन सोबत जोडणे अनिवार्य राहील.

महत्वाची सुचना:-सदर जाहिरात http://www.beed.nic.in या संकेतस्थळावर दि.१७/०८/२०१८ पासुन उपलब्ध राहील.तसेच पदभरतीबाबतची संपुर्ण माहिती याच संकेतस्थळावर उपबल्ध राहील. पदभरती बाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना सदर संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.याबाबत उमेदवाराशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.याची नोंद घ्यावी.यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देवुन अद्यावत माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

| | |
|---|---|
| सदस्य सचिव<br>निवड समिती<br>तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी<br>जिल्हा क्षयरोग केंद्र,बीड | अध्यक्ष<br>निवड समिती<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद बीड |

# अर्जाचा नमुना

उमेदवाराने अलिकडच्या कालावधीतील फोटो येथे चिकटवुन स्वाक्षरी करावी.

प्रति,

मा.सदस्य सचिव तथा
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र बीड

पदाचे नाव :-

अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

जातीचा प्रवर्ग :- जात :-

अर्जदाराचा संपुर्ण पत्ता :-

दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र. :-

जन्मतारीख :- (जाहिरात प्रसिध्द तारखेस वय) :-

शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | पात्रता /परिक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापिठाचे नाव | मिळालेले गुण | एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

इतर शैक्षणिक अर्हता

१.संगणक अर्हता :-

२.इतर :-

कामाचा अनुभव (होय/नाही):- (वर्ष.............महिना...........दिवस.....)

| अ.क्र. | धारण केलेले पद | कामाचे विवरण | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

दिनांक :-

ठिकाण :-

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी